MHPU090077952025

ई-फाईलिंग
दि.कि. अर्ज क्र. ३३०/२०२५
समीर शंकर पिंपळे वि. कोणी नाही.

निशाणी क्र. १ वरील आदेश
(घोषित दि. ११ मार्च २०२६)

०१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII), १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी केला आहे.

०२. अर्जदार यांचे संक्षिप्त कथन असे की, अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडिल शंकर नारायण पिंपळे यांचे दिनांक ०२/०५/२०२४ रोजी म्हस्के वस्ती, रावेत, पुणे येथे निधन झाले आहे. अर्जदार क्र. १ हा मयत शंकर नारायण पिंपळे यांचा मुलगा तर अर्जदार क्र. २ व ३ हया मुली आहेत. अर्जदार हे मयत शंकर नारायण पिंपळे यांचे कायदेशीर वारस आहेत, त्यामुळे अर्जदारांना वारस दाखला आवश्यक आहे. अर्जदाराच्या कथनानुसार फलॅट नं. १८१/ सी, सेक्टर २८, पीसीएनटीडीए, आकुर्डी ता. हवेली, जि. पुणे येथील मिळकतीवर लिज होल्डचे अधिकार होते. संबंधित ऑथोरिटीने अर्जदारांना त्यांच्या नावाच्या नोंदीकरता प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे सांगितले आहे. मयत हे मृत्यूपुर्वी रावेत येथे कायमस्वरुपी वास्तव्यास होते. मयत यांस अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

०३. दिनांक १७/१०/२०२५ रोजीच्या दैनिक प्रभात या वृत्तपत्रात जाहिर नोटीस देवून तसेच जाहिरनामा प्रसिध्द करुन हरकती मागवल्या त्याबाबतचा वृततपत्राचा अंक (टायटल इंडेक्स क्र. १२०) व बेलिफ सायटेशन रिपोर्ट (टायटल इंडेक्स क्र. १२०) हे अर्जदाराच्या वतीने अपलोड करण्यात आलेले आहे. त्यानंतरही सदर अर्जाच्या हरकत घेणे

कामी आजअखेर कोणीही हजर झाले नाही व हरकती घेतलेल्या नाहीत.

०४. अर्जदार यांच्या वतीने अर्जदार क्र. १ समीर शंकर पिंपळे यांनी सदर कथनाच्या पृष्ठयार्थ स्वतःचे पुराव्याकामी सरतपासाचे शपथपत्र (टायटल इंडेक्स क्र. ११७) दाखल केलेले आहे. सदर शपथपत्रामध्ये त्यांनी अर्जाच्या मजकुराचे पुर्नरकथन केलेले आहे व मयत यांना अर्जदार क्र १ ते ३ शिवाय अन्य वारस नाहीत असे सांगून अर्जदार क्र १ ते ३ यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्याच्या अर्जातील कथनास पुष्टी दिली आहे.

०५. अर्जदाराने दि. १६/०९/२०२५ च्या कागदपत्रांच्या यादीसोबत (टायटल इंडेक्स क्र. १०१) मयत शंकर नारायण पिंपळे यांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिलेली मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. मयत शंकर नारायण पिंपळे यांचे नावाचे रेशनकार्ड तसेच अर्जदार क्र १ ते ३ यांचे आधारकार्ड दाखल केलेले आहे. तसेच अर्जदार क्र २ व ३ यांनी अर्जदार क्र १ च्या हक्कात करुन दिलेले मुख्तयार पत्र दाखल केलेले आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्रावरुन मयत शंकर नारायण पिंपळे यांचा दि. ०२/०५/२०२४ रोजी मृत्यू झाल्याचे दिसून येते. मयतास अर्जदार क्र १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त इतर वारस नसल्याचे अर्जदाराचे कथन आहे.

०६. दि बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे नियम १ चे तरतुदीनुसार न्यायालयाचे मान्यतेनुसार मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करु शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी, त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन जाहीर प्रगटनानंतर एक महिन्याचे आत अर्जदारांचे हक्काबाबत आक्षेप घेण्यासाठी त्यांचे आक्षेप नोंदविणे गरजेचे असते. नियम ७ चा दुसरा भाग हा असे विहीत करतो की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क

निश्चित करीत नसुन ते फक्त सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था व्यक्तीचे वारसासाठी दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजुर केलेले प्रमाणपत्र अंतिमतः हक्क निर्णित करीत नाहीत किंवा इतरांचे हक्कास इजा/हानी पोहोचवित नाहीत.

०७. अर्जदाराचा अर्ज, पुरावा व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर असे दिसून येते की, मयत यांचे अर्जदार क्र १ हा मुलगा व अर्जदार क्र २ व ३ या मुली आहेत. अर्जदार यांनी पुराव्यादरम्यान त्यांना औपचारिक स्वरुपाचे प्रमाणपत्र पाहिजे असल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांची मागणी/ विनंती ही केवळ औपचारिक स्वरुपाची (formal recognition) दिसून येते. अर्जदार यांनी पुरावा बंदची पुरशीस (टायटल इंडेक्स क्र. १२१) वर दाखल केली आहे.

०८. अर्जदाराच्या सदरील अर्जास आजपर्यंत आक्षेप आलेला नाही अथवा कोणी हजर होवून आक्षेप घेतलेला नाही. अर्जदार यांची वारस प्रमाणपत्राची औपचारीक मागणी असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार क्र १ ते ३ हे मयत यांचा मुलगा व मुली या नात्याने मयत शंकर नारायण पिंपळे यांचे वारस आहेत, असे तात्पुरते मानणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र १ ते ३ नामे समीर शंकर पिंपळे (Samir Shankar Pimpale), रश्मी राजेश पाटील (Rashmi Rajesh Patil) व उल्का अजित दांडेकर (Ulka Ajit Dandekar) हे मयत शंकर नारायण पिंपळे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसप्रमाणपत्र अर्जदार यांना देण्यात यावे.

३. सदरचे प्रमाणपत्र केवळ औपचारिक स्वरुपाचे वारस (formal

recognition) म्हणुन देण्यात यावे.

४. सदरचे वारसाप्रमाणपत्र अर्जदार यांच्या नांवे योग्य ती कोर्ट फी भरुन देण्यात यावे.

५. सदर प्रमाणपत्र कोणत्याही स्थावर मिळकतीसाठी देण्यात येत नाही.

SHARAD NARAYAN GAVALI
Digitally signed by SHARAD NARAYAN GAVALI
Date: 2026.03.11 17:34:36 +0530

(एस.एन.गवळी)

दिनांक :-११/०३/२०२६. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पिंपरी .

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्रीमती कोमल मारुती सुरकुले, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | – | मे. श्री. एस. एन. गवळी,<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पिंपरी, पुणे |
| न्यायनिर्णय जाहीर केलेची दिनांक | – | ११/०३/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – | १२/०३/२०२६ |